# माझा विद्यार्थी

समाधान शिकेतोड

# माझा विद्यार्थी

चारोळी संग्रह

समाधान शिकेतोड

ई साहित्य प्रतिष्ठान

(ई आवृत्ती)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क श्री समाधान शिकेतोड यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण, ध्वनीमुद्रण, सादरीकरण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

मुखपृष्ठ : कनक वाईकर
kanak.waikar@gmail.com
Ph : 8888899126

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

©esahity Pratishthan®2015

ई प्रकाशन : २८ मार्च २०१५

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# माझा विद्यार्थी

समाधान शिकेतोड

निर्मल प्रकाशन, नांदेड

**निर्मल प्रकाशन –**
**ISBN -**

- **माझा विद्यार्थी (चारोळीसंग्रह)**
  समाधान शिकेतोड

- **प्रकाशक**
  निर्मलकुमार सूर्यवंशी
  निर्मल प्रकाशन
  'कृष्णाई', नरहर कुरुंदकर मार्ग,
  कैलासनगर, नांदेड–४३१ ६०५.
  मो. ९४२२८७०३९३

- **प्रथमावृत्ती**
  २०१३

- **सर्वाधिकार**
  समाधान शिकेतोड

- **मुखपृष्ठ**
  संतोष घोंगडे

- **अक्षरजुळणी**
  विजयकुमार चित्तरवाड
  मो. ९४२१९८७८०९

- **मुद्रक**
  मधुराज प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन्स्
  प्रा.लि. पुणे

**किंमत : रु.३०/–**

# मनोगत

'माझा विद्यार्थी' या चारोळी संग्रहाचे ई-बुक प्रतिष्ठानाकडून प्रकाशीत होत असल्यामुळे मला खुप आनंद झाला. मी पुर्वि सामाजिक विषयावर चारोळी लेखन करत होतो. मनात विचार आला की आपण प्राथमिक शिक्षणावर चारोळी लेखन करावे. ही कल्पना वास्तवात उतरवत असताना मी इयत्ता पहिलीपासून सर्व वर्गाच्या हस्तपुस्तीकांचा अभ्यास केला. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी प्रकाशीत केलेली पुस्तके वाचून काढली. दैनंदिन अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देत असताना, विविध प्रकल्प, उपक्रम राबवत असताना चारोळ्या सुचत गेल्या.

मला सर्वप्रथम धन्यवाद मानावे वाटतात ते दै. लोकमतचे या वर्तमानपत्रातुन माझ्या चारोळ्या प्रकाशीत झाल्यामुळेच माझे चालू राहिले. आदरणीय शिक्षणतज्ञ, शिक्षण सहसंचालक गोविंद नांदेडे यांची प्रेरणा मिळाली त्याबद्दल त्यांचा ऋणी आहे. तसेच शिक्षण उपसंचालक दिनकर टेमकर, शिक्षणाधिकारी सुचिता पाटेकर, औदुंबर उकिरडे, गटशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांचा मी ऋणी आहे. माझे मित्र साहित्यीक तथा शिक्षणविस्तार अधिकारी व्यंकटेश चौधरी यांनी खुप मौलीक मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा विशेष आभारी आहे.

अविरत ज्ञानदान करण्यासाठी आयुष्य झिजवणाऱ्या तमाम शिक्षक बंधु-भगिनींना हा चारोळी संग्रह अर्पण करतो. शेवटी ग्रामगीतेतील ओवी सांगण्याचा मोह आवरत नाही.

**या कोवळ्या कळयामाजी ।**
**लपले ज्ञानेश्वर रविंद्र शिवाजी ।।**
**विकसता प्रकटतील समाजी ।**
**शेकडो महापुरूष ।।**

**- समाधान शिकेतोड**

*सुचिता पाटेकर*
*शिक्षणाधिकारी (प्राथमिक)*
*जिल्हा परिषद, यवतमाळ*

---

समाधान शिकेतोड यांचा 'माझा विद्यार्थी' हा चारोळीसंग्रह एक छान साहित्यकृती आहे. या नवोदित कविने एक स्वागतार्ह पाऊल टकले आहे. चार ओळीच्या कवितामधून दप्तराविना शाळा, ऑक्सिजन पार्क, अवांतर वाचन, गणिती कोडी, दत्तक मैत्री प्रकल्प, मुलींचे शिक्षण, शालेय बाग या उपक्रमाविषयी जाणीव जागृती केली आहे. ज्ञानरचनावाद ही मध्यवर्ती संकल्पना छोट्या छोट्या कवितातून व्यक्त होताना दिसते.

समाधान शिकेतोड या उपक्रमशील शिक्षकाचा हा प्रयत्न शिक्षणक्षेत्रासाठी फलदायी व दिशादर्शक वाटतो. याचा प्रत्यय शाळा- शाळातून दिसेल अशी आशा वाटते.

त्यांच्या या साहित्यकृतीला व भावी यशासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

*सुचिता पाटेकर*
*शिक्षणाधिकारी (प्राथमिक)*
*जिल्हा परिषद, यवतमाळ*

*तृप्ती अंधारे*

*गटशिक्षणाधिकारी*

*पंचायत समिती, भूम*

---

शाळा शिक्षण आणि विद्यार्थी याबद्दल मनात प्रचंड आस्था असणारे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक समाधान शिकेतोड यांचा 'माझा विद्यार्थी' हा चारोळी संग्रह म्हणजे प्राथमिक शिक्षणावर संवेदनशीलपणे आणि चिंतनशील केलेले भाष्य आहे.

या सर्व चारोळया म्हणजे विद्यार्थ्यांचे मनोगतच आहे जणू ....!

अध्ययन-अध्यापनाची मौलिक सूत्रचं त्यांनी या चारोळीसंग्रहाच्या माध्यमातून साक्षात केली आहेत.

समाधान, स्वत: एक उपक्रमशील शिक्षक आहेत. सतत विद्यार्थ्यांमध्ये रमणारे, त्यांच्या भावविश्वासी एकरूप होणारे... विद्यार्थी विकासाच्या त्याच ध्यासातून 'माझा विद्यार्थी' या संग्रहाचे निर्माण त्यांनी केलेले आहे.

समाधान, तुमच्या या अभिव्यक्तीला माझ्या लक्ष लक्ष शुभकामना आणि अभिनंदन !!

*तृप्ती अंधारे*

*गटशिक्षणाधिकारी*

*पंचायत समिती, भूम*

समाधान शिकेतोड यांचा ' माझा विद्यार्थी ' हा चारोळीसंग्रह म्हणजे प्राथमिक शिक्षणातील मूलगामी तत्वज्ञानाच्या चिंतनाचा सुंदर आविष्कार आहे . संपूर्ण आणि सर्वांगीण विद्यार्थी विकासाच्या ध्यासातून सहज- सुगम शब्दांतून व्यक्त झालेले हे शब्दचिंतन मुलांच्या कल्यानासाठी अहर्निश धडपडणा-या अध्यापकांना संजीवक प्रेरक ठरावे असे आहे.


चिमुकल्यांना घडवणं तसं अवघडच ! त्यांच्या विश्वात मिसळून, विरघळून हे साध्य सहज करता येतं, ही जाणीव या कवितांमधून होते. एक प्रकारचा हा शिक्षण- संदेश आहे.

समाधान शिकेतोड हे उपक्रमशील, चिंतनशील अध्यापक आहेत. विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी सातत्यानं ते प्रयोगशील असतात. याच वास्तव अनुभवाला त्यांनी शब्दरूप दिलंय.

हे शब्दरूप महाराष्ट्रातील वर्गखोल्यांतून रूजवावं इतपत अनुकरणीय आहे. ' माझा विद्यार्थी ' मधून प्रारंभिलेला लेखनप्रवास अखंड राहावा ही आत्मीय कामना...

व्यंकटेश चौधरी


शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती नांदेड



मूल अडेल तेथे
त्याला साह्य करू
आपण सारे सुलभक आता
शिक्षणाचा आग्रह धरू

अध्ययनभार वाटणार नाही
म्हणून मजेदार उपक्रम घेऊ
विविध उपक्रमांतून मुलांना
अध्ययन अनुभव देऊ






शालेय बागेत आपण
औषधी वनस्पती लावूया
तुळशीची लागवड करून
ऑक्सीजन पार्क करूया

सोप्या व रंजक उपक्रमात
आनंदाने बागडतात मुले
शिकण्याची गोडी लागून
कळ्यांची होतात फुले






कल्पनेने आठवून
मुले चित्रे काढतात
मनातील संवाद
त्यांच्याशी साधतात

जर त्याला स्पर्धा परीक्षेची
आवड निर्माण होईल
नक्कीच तो उद्याचा
प्रशासकीय अधिकारी होईल






जीवन कौशल्याचे शिक्षण
अध्ययन अनुभवातून देऊया
जीवन जगण्यास मुलांना
समर्थ आपण बनवूया

लोकचेतना अभियानातून
लोक सहभाग घेऊया
शाळेचा दर्जा उंचावून
शाळा प्रगतीपथावर नेऊया






सहा ते चौदा वयोगट
जाऊ नये वाया
प्राथमिक शिक्षण तर
आहे जीवनाचा पाया

नोकरी कुठं लागतीय
बदलून टाका मत
शाळेत पाठवा मुलाला
शिक्षणाशिवाय नाही गत






शिक्षण हक्क कायदा
आला आपल्या दारी
शाळेत पाठवा मुलाला
ठेवू नका घरी

वक्तृत्व कलेवर आम्ही
निर्माण करू मक्ता
माझा विद्यार्थी होईल
उद्याचा महान वक्ता






उत्तम शिक्षणासाठी शिक्षकांनी
कल्पकतेने उपक्रम राबवावे
पाठ्यपुस्तकाच्या बाहेर जाऊन
प्रयोगशील शिक्षण राबवावे

ज्ञानरचनावाद म्हणजे
ज्ञान रचले जावे
अनुभवाधारित शिक्षणातून
शिक्षण घेतले जावे






घोका आणि ओका
ही पद्धत बंद करू
शाळेमध्ये आपण
स्वयं अध्ययनाचा आग्रह धरू

पुस्तकापलीकडच्या अनुभवातून
शिक्षण आपण देऊ
मुलांच्या सामाजिक जाणिवा
जागृतीचा वसा आपण घेऊ






चार भिंतीच्या बाहेर
मुले जर शिक्षण घेतील
शिक्षण आणि जीवन
यांचे अनुभव त्यांना येतील

विद्यार्थी स्वतःच शिकतो
सांगा बरे कसे
पेरलेले बी आपोआप
उगवते जसे






अक्षर ओळखीशिवाय शब्दवाचनाचे
रहस्य समजून घेऊया
वेगवेगळे उपक्रम राबवून
अक्षर वाचन शिकवूया

ज्ञानदान करण्यासाठी
आयुष्य वाहिले जरी
माझे विद्यार्थी हीच
माझी दौलत खरी






रोज शाळेच्या फलकावर
सुविचार वार्ता काढा
दररोज परिपाठात घ्या
जो दिनांक तोच पाढा

प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी आपण
वेगळे अध्यापन करूया
एक तास विद्यार्थ्यांसाठी
प्रज्ञेचा गौरव करूया






कच्च्या मुलांना दत्तक घेण्याचा
हुशार मुलांनो करा संकल्प
कच्च्या मुलांची वाढवू गुणवत्ता
राबवून दत्तक मैत्री प्रकल्प

अभ्यासगट तयार करून
नावीन्याची कास धरू
स्वयंअभ्यास करण्यासाठी
अभ्यास मंडळ तयार करू






पटनोंदणी शंभरटक्के करून
मुलाची गुणवत्ता वाढवावी
सतत पालकभेट घेऊन
मुलाची गळती थांबवावी

जीवनात शिक्षणाचे महत्त्व
सांगू समजून पालकांना
त्यांची मानसिकता बदलल्यावर
शाळेत धाडतील बालकांना






लहानपणीच त्याला जर
वाचनाचा छंद जडेल
उद्याचा जो एक
महान व्यक्त घडेल

विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आपण
युवक मंडळाचे साह्य घेऊ
शिक्षणाची ही ज्ञानगंगा
आपण घरोघरी नेऊ






शैक्षणिक साहित्याचा वापर
करायला हवा अध्यापनात
नवीन संकल्पना शिकताना
मनोरंजकता येईल अध्ययनात

सर्वांच्या हितासाठी आपण
श्रमदानाची कामे करू
श्रमप्रतिष्ठा येईल अंगी
स्वावलंबनाची कास धरू





अवांतर वाचनाची मुलांना
आपण लावू गोडी
वाचनात दंग झाल्यावर
करणार नाही खोडी


गणिताच्या अध्यापनात
देऊ त्यांना कोडी
रंगून जातील अभ्यासात
लागेल गणिताची गोडी



स्वच्छतेचे पाईक होऊन
होऊ गाडगेबाबांचे सूत
संपूर्ण स्वच्छता अभियानात
बनू स्वच्छतेचे दूत

अजिबात न येणाऱ्या मुलांसाठी
तळमळीनं अध्यापन करू
लेखन वाचन कार्यक्रमातून
ज्ञानाची ओंजळ भरू





ग्रामस्वच्छता अभियानात
हातात घेऊन झाडू
सफाई गीत गात गात
ग्रामस्वच्छता पार पाडू


शालेय परिसराच्या स्वच्छतेसाठी
स्वच्छता संकूल बांधून घेऊ
संपूर्ण स्वच्छता अभियान
आपण प्रगतीपथावर नेऊ



माता पालक संघाने
ठराव असा केला
सहा वर्षे झाल्यावर
मुलीला शाळेत घाला

मुलींची गळती थांबवून
शिक्षणाच्या प्रवाहात नेऊ
त्यांच्यापुढे आदर्श आपण
कल्पना चावलाचा ठेवू






लेखनदोष सुधारण्यासाठी
उपक्रम हाती घेऊ
अपरिचित शब्दांचे
त्यांना श्रुतलेखन देऊ

मूल म्हणजे चिखलाचा गोळा
विचार आता बदलायला हवा
ज्ञानरचनावादाचा स्वीकार करून
मुलांच्या स्वयंप्रेरणेला वाव हवा






कार्यक्रमाचे आयोजन करून
व्यासपीठावर संधी देऊ
सुप्त गुणांच्या विकासासाठी
सांस्कृतिक कार्यक्रम घेऊ

शैक्षणिक सहली काढून
निसर्गाच्या सहवासात जाऊ
चार भिंती ओलांडून
बाहेरचे जग पाहू






सर्व प्रकारच्या पुस्तकाने
अद्ययावत ठेवू पुस्तकपेढी
विविध पुस्तके मुलांना देऊन
लावू त्यांना वाचनाची गोडी

संगणकाच्या शोधाने
जग जवळ आले
दुरस्थ शिक्षणामुळे
शिक्षण एकरूप झाले






अंकगीते गात गात
ओळख होईल संख्यांची
गीतातील कृती करत करत
गाणी गाऊया अंकांची

बेरजेचे तंत्र शिकताना
पाहून तो स्वाध्याय कार्ड
बरोबर उत्तर शोधून
लावतील तेथे संख्या कार्ड






अध्यापन करताना आपण
फलकावर काढू संख्यापट्टी
पटकन गणिते सोडवून
करूया गणिताशी गट्टी

व्यवस्थापन समितीच्या बैठकीत
ठराव असा घ्यावा
गावातील एकही मुलगा
शाळेबाहेर न राहावा





केंद्रातील सर्व माहितीसाठी
नवीन पायंडा पाडू
केंद्र समाचार नावाची
एक हस्तपुस्तिका काढू


वळणदार अक्षर कोणाचे
स्पर्धा आपण घेऊ
स्फुट लेखन करून घेऊन
भित्तीपत्रिका बोर्डावर लावू



वैयक्तिक मार्गदर्शन करीत
त्याच्याजवळ जाऊन बसा
शून्य गुण घेणारा विद्यार्थी
वर्गात राहीलच कसा ?

उपस्थिती वाढविण्यासाठी
घरा-घरापर्यंत जाऊया
शंभर टक्के उपस्थिती
उद्दिष्ट पूर्ण करूया






शाळेत आल्यावर मुलांनो
स्वच्छतेने नियम पाळा
नेहमी ठेवू आपण
स्वच्छ सुंदर शाळा

मुलांचा अभ्यास घेण्यासाठी
आपला वेळ द्यावा
गुणवत्ता विकास अभियानात
पालकांनी सहभाग घ्यावा






शाळेचा करणार आम्ही
उज्ज्वल गुणवत्ता विकास
शंभर टक्के यशाचा
घेतलाय आम्ही ध्यास

मूल्यशिक्षण त्यांना
संस्कारक्षम वयात देऊ
सुसंस्कृत नागरिक बनवून
देश प्रगतीपथावर नेऊ





चावडी वाचनाच्या कार्यक्रमाला
जसा जसा चढला रंग
प्रगती मुलांची पाहून
पालक झाले दंग


टाकाऊ वस्तुपासून आपण
टिकाऊ साहित्य करू
अध्यापनाची वर्ग खोली
शैक्षणिक साहित्याने भरू



चावडी वाचनाच्या व्यासपीठावर
प्रगती पाहून बालकांची
चावडी वाचनाच्या कार्यक्रमात
मनं खुलतील पालकांची

येऊ नको फडात
शाळेत जा बाळा
तुझ्यासाठी उघडलीय
एक साखरशाळा






विद्यार्थ्यांच्या विकासासाठी
मनात उर्मी धरू
धडपडणाऱ्या शिक्षकासाठी
धडपड मंच तयार करू

मुलांचे सुप्त गुण
नजरेला इथंच पडतील
शाळेतील कलापथकातच
उद्याचे कलाकार घडतील





क्षमता संपादन करून
लक्ष गाठू गुणवत्तावाढीचे
गुणवत्ता चाचणी घेताना
साह्य घेऊ प्रश्नपेढीचे

नेतृत्व गुणांची वाढ करून
जबाबदारीची जाणीव निर्माण करू
लोकशाहीची मूल्ये बिंबवण्यासाठी
शालेय मंत्रीमंडळ तयार करू



बचतीची सवय आपण
आतापासूनच लावूया
एक एक पैसा आपण
धनश्रीत जमा करूया

शिक्षण जागरण सप्ताहातून
शिक्षणाचा संदेश देऊ
गावातील शाळाबाह्य मुलांना
शाळेत आपण नेऊ



वर्गाची गुणवत्ता वाढविण्याचा
आज निश्चिय करूया
गुणवत्तेचा स्तंभ उंचवण्याचा
मिळून प्रयत्न करूया

प्रत्येक मुलीला देऊ
सक्तीचं प्राथमिक शिक्षण
त्याच तर करतील
आपल्या कुटुंबाचं रक्षण



सानेगुरुजींचा आपण
पुढे चालवू वारसा
विद्यार्थीच तर आहेत
शिक्षकांचा आरसा


अध्ययनअक्षम मुलांचे आम्ही
बनू दत्तक पालक
लेखन वाचन कार्यक्रमातून
घडवू साक्षर बालक



संपला फड ऊसाचा
कोयत्याला नाही विसावा
फिरता संसार आमचा
मुलगा साखर शाळेत असावा

अभिव्यक्ती फलक
व्हरांड्यात असू द्या
मुलांच्या अभिव्यक्तीला
संधी मिळू द्या






आकाशवाणीचे कार्यक्रम ऐकण्यास
आपण काढू सवड
अध्यापनात येईल विविधता
मुलांची वाढेल आवड

इंद्रधनुष्याचे रंग पाहून
डोळे दिपले फुलांचे
चावडीवाचनाचा कार्यक्रम पाहून
कौतुक होईल मुलांचे






पहिलीपासून इंग्रजी आली
मुले त्यात रमत आहेत
पाडा, वस्ती तांड्यावर
ऱ्हाईमस् आज घूमत आहेत

जरी शाळा असली दूर
शिक्षण आपण घेऊ
मुलांचे शिक्षण होण्यासाठी
त्याला वस्तीशाळेत नेऊ






घन हातातला सोडून
शिक्षण घेतात गजडजे
पाषाण शाळेत मुले
शिकतात ज्ञानाचे धडे

लेखन वाचन कार्यक्रमात
स्वतःला वाहून घेऊ
साठ दिवस शिकवून
त्यांना सर्वांबरोबर नेऊ





लेखन वाचन कार्यक्रम
राबवू आपण असा
निरक्षर विद्यार्थी शाळेत
बघू राहतो कसा ?



# ई साहित्य प्रतिष्ठान

मित्रहो , सहजासहजी काहीच मिळत नाही. न आरोग्य न धन न संपदा. काहीही मिळवायचं तर संघर्ष आणि श्रम करावेच लागतात. “गोलमाल” करून, झटपट “मेकओव्हर” सर्व काही मिळवता येतं असा गैरसमज माध्यमांद्वारे सर्वत्र पसरवला जात आहे. झटपट श्रीमंती, आठ दिवसांत गोरेपणा, महिन्याभरात लांबसडक केस, एक हनुमान यंत्र गळयात बाधले की आजारांपासून मुक्ती अशा जाहिराती माथी मारल्या जात आहेत. अशा वेळी अशी पुस्तकं वाचून माणूस “जमिनीवर” येतो. फ़ुकट काहीच मिळत नसतं. प्रत्येक गोष्टीसाठी कुणाला न कुणाला कष्ट पडतात. कधी आपल्याला, कधी आपल्या आईवडलांना, गुरूना, तर कधी समाजातील इतरांना.

ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तकं विनामूल्य मिळतात. पण ती लिहिण्यासाठी लेखकांचे कष्ट व बुद्धी लागलेले असतात. आणि या एकेका पुस्तकाची किंमत म्हणुन लेखक हजारो लाखो रुपये मिळवू शकतात. पण मराठी वाचकांना विनामूल्य पुस्तकं मिळावी, व मराठीत वाचन संस्कृती वाढावी म्हणून असंख्य लोक प्रयत्न करीत

आहेत. या प्रयत्नांत ई साहित्य प्रतिष्ठान व हे सर्व लेखक सहभागी आहेत. आपण या अभियानात सहभागी झालात का?

आपण ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद झालात का?

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे.

आपल्या ओळखीच्या दहा मराठी लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांच्या त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान